# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४.

Office Phone Chairman- (0231) 2690829(O) 2690679 (R) Secretary -2691405 (O) 2656044 (R)
EPBX 2696101,102,103, Fax -2690758 E-mail divsec.kop@gmail.com


क्र.कोविमं/१२वीपरीक्षा/227
दिनांक : २९/०४/२०२१

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा - सातारा,सांगली, कोल्हापूर.

विषय - उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा २०२१ मधील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या वैद्यकिय प्रमाणपत्राबाबत ...

संदर्भ - १. क्र.रा.मं./परीक्षा -५/२०१८ दि.२६/०४/२०२१ चे पत्र.
२. शासन निर्णय क्र.संकीर्ण -२०१७ /(११८/१७)/एस.डी.६,दि.१६ ऑक्टोबर २०१८.

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, सन २०२१ मधील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी ) परीक्षा नजिकच्या काळात घेण्याचे प्रस्तावित आहे. सदर परीक्षेत प्रविष्ठ होणा-या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असणा-या सुविधांबाबतचा संदर्भिय शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

विभागीय मंडळामार्फत दिव्यांग विद्यार्थ्यांना सवलती मिळणेकरीता प्रचलित पध्दतीनुसार विहित नमुन्यात अर्ज घेतला जातो व त्यासोबत विहित नमुन्यात अद्ययावत वैद्यकिय प्रमाणपत्र घेण्यात येते. मात्र सद्यस्थितीत कोविड १९ विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना सदर प्रमाणपत्र मिळविण्यास अडचणी येत आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांकडे उपलब्ध असलेले सक्षम प्राधिका-याचे दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्रच सद्यस्थितीत या परीक्षेसाठी ग्राहय धरण्यात यावे.

सदर प्रमाणपत्राच्या आधारे दिव्यांग विद्यार्थ्यांना यावर्षीच्या परीक्षेसाठी शासन निर्णयातील तरतुदीनुसार सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसेच कोणताही दिव्यांग विद्यार्थी या कारणास्तव सदर सुविधापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

(श्री. देविदास कुलाळ )
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**